IJCRT.ORG ISSN : 2320-2882
INTERNATIONAL JOURNAL OF CREATIVE RESEARCH THOUGHTS (IJCRT)
An International Open Access, Peer-reviewed, Refereed Journal

# शिवकालीन इतिहासातील विश्वसनीय ऐतिहासिक साहित्य - बखर

**अमितकुमार गणेश शिंगणे**
संशोधक विद्यार्थी
एम.इ.एस. कॉलेज मेहकर,
जि. बुलढाणा.

**प्रस्तावना -**

बखरींची पूर्व परंपरा प्राचीन भारतीय मौखिक वाङ्मयातून दिसून येते. राजसूत्र व अश्वमेध यज्ञ केल्यांनतर वीर पुरुषांचा इतिहास वाचून दाखविण्याची प्रथा होती. ज्यामध्ये वेद व पुराणांचा इतिहास लोकांपर्यंत पोहोचविण्यासाठी अशा साहित्याचा उपयोग केला जात. कारण मौखिक इतिहासाचे संक्रमण या माध्यमातून करतांना बखरकार सत्य शोधन करताना कल्पना व वास्तवाच्या सीमारेषेवर उभे राहुन वर्णन करतात. त्यांच्या कलात्मक सर्जनशील अभिव्यक्तीमुळे इतिहास अधिक मनोरंजक आणि तेवढाच रोमांचकारी करण्याचा प्रयत्न केला जातो हे विशेष होय.

'**बखर**' या शब्दाची उत्पत्ती बखर या अरब शब्दापासून झाली. बखर याचा अर्थ खबर व खबर म्हणजे वार्ता, माहिती, समाचार. इतिहासाचार्य वि. का. राजवाडे यांच्या मते, 'बख, बकणे, बोलणे या धातूपासून बखर शब्द मराठीत तयार झाला आहे. यावरुन फार पूर्वी बखरी तोंडाने बोलत व हाताने लिहीत असत. बखर हा शब्द स्त्रीलिंगी वापरतात. या शब्दाचा रुढ अर्थ राजकीय बातमी किंवा इतिहास असा आहे. हेरवाडकर यांच्या मते, 'मुसलमानांच्या सहवासाने, त्यांच्या तबारिया पाहून, मराठ्यांनीही बखरी लिहिण्याचा प्रघात पाडला. बखर हा शब्द परकियांच्या प्रभावापासून रुढ झाला आहे. मूळ अरबी शब्दाचे ते देशी रूप आहे असे म्हटले आहे. '**महाराष्ट्र सारस्वत**' हा ग्रंथ वि. ल. भावे यांनी लिहिला, त्याच्या विस्तारात पुरवणीकारांनी असे म्हटले आहे की, 'मराठेशाहीत बखर हा शब्द माहिती देणे या अर्थाने रुढ झालेला दिसतो.

गतकालीन जीवनाचे यथार्थ चित्रण करतांना बखरकार मौखिक इतिहासाच्या माध्यमातून ऐकीव माहिती संकलित करतात व त्यांचे हुबेहूब वर्णन करून प्रसंग रेखाटतात. घटना व प्रसंगांची सुसंगती लावून इतिहासाचे प्रतिबिंब बखरकार आपल्या कलाकृतीमध्ये दर्पणाप्रमाणे उमटवीत असतात.

बखर वाङ्मयाबाबत डॉ. भीमराव कुलकर्णी लिहितात, “शिवचरित्राची मूळ चिरेबंदी बैठक कृष्णाजी अनंत सभासदांनी लिहिलेल्या बखरींवर आधारलेली आहे." बखरीतील इतिहास हा लोकस्मृतीवर आधारलेला आणि तेवढाच वस्तुनिष्ठ असल्यामुळे त्यातील तथ्ये ही ऐतिहासिक कागदपत्रे व इतर साधनांच्या आधारे पडताळून घ्यावी लागतात. या सर्व तथ्यांची सलग, सुसंगत आणि तेवढीच सुसंबंध्द मांडणी करुन काही नवे पैलू प्रकाशात आणता येतात व त्या आधारे लोकेतिहासाची नव्याने आखणी करता येते.

'**बखर**' वाङ्मय हे मध्ययुगीन इतिहासाचे एक महत्त्वपूर्ण साधन असून, आजवर मराठी बखरीचा वाङ्मयीन दृष्टीने विपुल अभ्यास झाला असला, तरी ऐतिहासिक साधन या दृष्टीने शिवकालीन बखरींचा विशेष अभ्यास झालेला नाही. त्यामुळे शिवकाळातील प्रमुख बखरींचा आढावा घेणे हा या शोधनिबंधाचा उद्देश्य आहे.

**शिवकालीन बखरी -**

शिवकालीन बखरीचा अभ्यास करताना, शिवकालीन विश्वसनीय बखर म्हणून कृष्णाजी अनंत सभासदविरचित **‘शिवप्रभूचे चरित्र’** या बखरीचा मान पहिला आहे. त्यानंतर चिटणीस बखर, 91 कलमी बखर, शिवदिग्विजय इत्यादी प्रमुख बखरींचा क्रम लागतो. सभासद बखर शिवाजी महाराजांच्या मृत्यूनंतर दहा वर्षांनी लिहिल्या गेली; त्यानंतर अनेक बखरी लिहिल्या गेल्या. डॉ. अ. रा. कुलकणी यांच्या मते, “शिवचरित्राच्या संदर्भात अधिकाधिक माहिती देणारे साधनग्रंथ म्हणून बखरींचा विचार करणे आवश्यक ठरते”. शिवचरित्राची संपूर्ण माहिती महाराष्ट्राला प्रथम सभासद बखरीमुळे झाली. त्यामुळे या साधनाचे विशेष महत्त्व आहे. डॉ. अ. रा. कुलकर्णी पुढे म्हणतात, “शिवचरित्राच्या लेखनासाठी सभासद बखर ही सर्वात विश्वसनीय बखर आहे”. सभासद बखरीमध्ये कालक्रम विसंगती व अतिशयोक्ती हे दोष असले तरी सभासदांनी दिलेली माहिती बरीचशी अचूक असून इतर साधनांशी पडताळून पाहिल्यास त्यात सत्यता आढळते. यावरुन या बखरींचे महत्व लक्षात येते. शिवकालीन आठ बखरी प्रामुख्याने उपलब्ध आहेत. यापैकी प्रत्येक बखरीची थोडक्यात ओळख पुढील प्रमाणे केलेली आहे.

**1. सभासद बखर -**

छत्रपती राजाराम महाराजांच्या आज्ञेवरुन कृष्णाजी अनंत सभासद यांनी ही बखर इ. स. 1694 मध्ये लिहावयास घेतली व तीन वर्षांनी म्हणजे इ. स. 1697 मध्ये जिंजी येथे मुक्कामी असताना पूर्ण केले. सभासद हे शिवाजी महाराजांच्या समकालीन असले तरी त्यांनी ही बखर शिवाजी महाराजांच्या मृत्यूनंतर तब्बल 17 वर्षांनी लिहिली. त्यामुळे महानायकाच्या मृत्यूनंतर दोन दशकांच्या आत लिहिल्या गेलेली ही एकमेव बखर आहे. ही शिवाजी महाराजांच्या कार्यावर प्रकाश टाकणारी सर्वांत जुनी बखर म्हणून अत्यंत उपयुक्त असून ऐतिहासिक दृष्टीकोनातून महत्त्वाची ठरते.

**2. 91 कलमी बखर -**

ही बखर तारीख-इ-शिवाजी, 90 किंवा 96 कलमी बखर, रायरी बखर या नावानेही इतिहासात परिचित आहे. या बखरीमध्ये 91 कलमे असून ही बखर 1786 ते 1807 या कालखंडात लिहिल्या गेली आहे. या बखरीचा कर्ता दत्ताजी त्रिमल वाकेनवीस हा आहे. हे शिवाजी महाराजांचे व्यक्तिगत सचिव होते. ती '**प्रभात**' व '**भारतवर्ष**' या मासिकात

छापण्यात आली. या बखरीतील सर्वच्या सर्व कलमे इतिहास संशोधक वि. स. वाकसकर यांनी 1930 मध्ये 'भारतवर्ष' या मासिकात छापून प्रसिध्द केली.

या बखरीच्या प्रस्तावनेत वाकसकर लिहितात की, “शिवचरित्रप्रदीप या सर्वसंग्राहक ग्रंथाच्या 24 व्या पृष्ठावर 91 कलमी बखरींचा लेखनकाल इ. स. 1760 पासून 1790 पर्यंतचा असावा असे लिहिले आहे”. अशा प्रकारचे संदर्भ या बखरीचा कालावधी निश्चित करण्यासाठी उपयुक्त आहेत. वाकसकर यांच्या मते, 91 कलमी बखरीनंतर मालोजी, खेलोजी, शहाजी या तीन शिवपूर्वजांची चरित्रे दिली आहेत. शहाजी हे शिवाजी राज्याचे तीर्थरूप. त्यानेच शिवबाला स्वांतत्र्योन्मुख केले. शिवपूर्वकाळात स्वांतत्र्याची मशागत कशी झाली हे समजून घेण्यासाठी या बखरीचे संदर्भ उपयुक्त आहेत.

**3. चिटणीस बखर -**

मल्हार रामराव चिटणीस यांनी ही बखर सातारा जिल्हयातील बोरगाव या गावी लिहिली. या बखरीला शिवाजी महाराजांचे ‘**सप्तप्रकरणात्मक चरित्र**' या नावानेही संबोधले जाते. मल्हार रामराव चिटणीसांनी या बखरीला '**संभाजी महाराज**' या नावानेही संबोधिले. मल्हार रामराव चिटणीसांनी '**संभाजी महाराज**' आणि '**राजाराम महाराज यांचे चरित्र**' अशा आणखी दोन बखरी लिहिल्या. चिटणीस बखरीत छत्रपती शिवाजी महाराजांपासून प्रतापसिंह महाराजांच्या कारकीर्दीची माहिती विशद करण्यात आलेली आहे. ही बखर 1810 च्या सुमारास पूर्ण केल्याची नोंद सापडते; परंतू दुसरे शाहू छत्रपती 4 मे 1808 रोजी मरण पावले आणि 8 जून 1810 रोजी त्यांनी बखर लिहिण्याची आज्ञा केली ही विधाने विसंगत आहेत.

चिटणीसांनी हे चरित्र केव्हा पूर्ण केले यांची ही या बखरीत नोंद नाही. डॉ. अ. रा. कुलकर्णी म्हणतात, “ऐतिहासिक प्रसंग देताना चिटणीसांनी अस्सल कागदपत्रांचा कसोशीने उपयोग केला असेलच असे खात्रीपूर्वक म्हणता येत नाही. शिवाय चिटणीस हे राजाराम महाराजांच्या पक्षाचे पुरस्कर्ता असल्यामुळे संभाजी महाराजांचे व्यक्तिमत्त्व त्याने विकृत रेखाटले आहे. आपले पूर्वज बाळाजी आवजी याला संभाजी राजांनी देहांताची शिक्षा दिली होती म्हणून मल्हार रामरावाचा संभाजी महाराजांवर राग असणे स्वाभाविक ठरते." यावरुन चिटणीस बखरीतील वर्णने ही सत्याऐवजी कपोलकल्पित आहेत असे कमल गोखले इत्यादी अभ्यासकांनी सिध्द केले आहे. शिवाय छत्रपती संभाजी कालीन पत्रव्यवहारातूनही या बखरीचा फोलपणा लक्षात येतो.

**4. शिवदिग्विजय बखर -**

शिवदिग्विजय ही बखर 1817 च्या सुमारास लिहिल्या गेली. या बखरीचा लेखक अज्ञात आहे. तरीही बडोदा येथील चिटणीस घराण्यातील कोणीतरी ही लिहिलेली असावी असा अंदाज आहे. श्री. पा. रा. नंदुरबारकर आणि श्री. ल. का. दांडेकर यांनी संपादन करुन ती 1895 यावर्षी छापली. त्यावेळी उपलब्ध असलेल्या बखरीतून अनेक घटना निवडून लेखकाने त्याचे पुनर्लेखन केले असावे असे त्या बखरीतील मजकुरावरुन समजून येते. इतिहासाचे एक साधन म्हणून शिवदिग्विजय या बखरीचे महत्त्व बरेच कमी आहे. “कारण त्यातील माहिती एक तर अपुरी आहे किंवा ती कालदृष्टीने विपर्यस्त स्वरूपाची तयारी आहे.”

**5. चित्रगुप्ताची बखर -**

चित्रगुप्ताची बखर ही इ. स. 1759 च्या सुमारास लिहिल्या गेली असून तिचा कर्ता रघुनाथ यादव चित्रगुप्त (चित्रे) हा आहे. या बखरीत शबअशध बखरीमधील मजकूर अंतर्भूत असून अधूनमधून त्याने आपल्या कविता टाकलेल्या आहेत. या बखरीचा कर्ता ही बाळाजी आवजी चिटणीस यांच्याच घराण्यातील होता. सदर बखरीचे मूल्यमापन करताना इतिहासाचार्य वि. का. राजवाडे म्हणतात. "रघुनाथ यादवांना परंपरेने ऐकलेली शिवाजी महाराजांची व त्यांच्या वेळच्या कर्त्या पुरुषांची पुष्कळ माहिती होती. सभासदांच्या बखरीत ज्या पुरुषांनी आडनावे दिली नाहीत, त्यांची आडनावे चित्रगुप्त लिहिण्याच्या झोकात सहजासहजी देऊन जातो व कधीकधी वर्णनात सभासद बखरीत जी नावे मुळीच नाहीत, ती देखील नव्यानेच दिली. ही सर्व माहिती तपशील म्हणून महत्वाची आहेत; पण ती तपासून घेतली पाहिजेत." प्रभाकर देव म्हणतात, "1765 च्या सुमारास लिहिलेल्या या बखरीतून शिवकाळाविषयी बरीच विश्वसनीय माहिती उपलब्ध होते. चित्रगुप्त बखरीतील हे सर्व संदर्भ नवा तपशील देणारे आणि इतिहासात भर टाकणारे आहेत; पण ते अन्य साधनांच्या आधारे पडताळून पाहिले पाहिजे."

**6. मराठी साम्राज्याची छोटी बखर -**

मराठी साम्राज्याची छोटी बखर ही सन 1817 च्या सुमारास लिहिल्या गेली असावी. श्री. बाळाजी जनार्दन मोडक यांनी तिचे संपादन करून इ.स. 1889 मध्ये ती काव्येतिहास संग्रहात छापली. चिटणीस बखरीच्या मानाने ही सामान्य स्वरूपाची आहे. या बखरीत शिवकालीन घटना विस्कळीतपणे आणि अतिरंजित रेखाटलेल्या आढळतात.

**7. श्रीशिवाजी प्रताप बखर -**

प्रा. मदन मार्डीकर यांच्या मते, "श्रीशिवाजी प्रताप ही बखर इ. स. 1829 मध्ये लिहिली असून, तिचा कर्ता अज्ञात आहे व ती पुरेशी विश्वसनीय नाही." या बखरीत शिवाजी महाराजांच्या बालपणावर प्रकाश टाकण्यात आलेला आहे. स्वपराक्रमाने स्वराज्याची स्थापना करणारे 'बाळराजे' पुढे 'छत्रपती शिवाजी महाराज' कसे झाले याचे वर्णन यात आढळते. तसेच शहाजी महाराज व शिवाजी महाराज यांच्यातील संबंध, जिजाबाई व शिवाजी महाराज यांच्या संबंधावर देखील या बखरीमध्ये प्रकाश टाकण्यात आला आहे.

**8. पंत प्रतिनिधी बखर -**

पंत प्रतिनिधी ही बखर रावसाहेब गोविंदराव सरखेल यांना तंजावर येथे सापडली. ही बखर इ.स. 1844 च्या सुमारास लिहिल्या गेली असावी. श्री. द. व. पारसनीस व श्री. ह. ना. आपटे यांनी ती 'भारतवर्ष' या मासिकात छापली. या बखरीत बरीच माहिती विसंगत आहे. या बखरीत विशाळगडाच्या पंत प्रतिनिधीची बरीचशी हकिकत लिहिलेली असल्यामुळे या बखरीला '**पंत प्रतिनिधींची बखर**' असे म्हणतात. या बखरीचा काळ 1844 असावा. असे कुलकर्णी व खरे म्हणतात. शिवकालीन इतिहासावर प्रकाश टाकणाऱ्या वरील आठ महत्त्वपूर्ण बखरी आहेत.

**शिवकालीन बखरीची वैशिष्टये -**

इंग्रज इतिहासकार ग्रँड डफ म्हणतो, "मराठी सत्तेचा उदय म्हणजे सह्याद्रीच्या अरण्यात एकाकी भडकणारा वणवा होता". येथील लोकांमध्ये प्रामाणिकपणा, दिलदारपणा, धिटपणा, साधेपणा, न्यायीपणा, प्रयत्नवादीपणा, शौर्य, स्वातंत्र्यप्रियता, स्वाभिमान, दीर्घोद्योग, सहनशिलता, सामाजिक समता इत्यादी गुणांची वाढ झाली, हेच मराठ्यांचे स्वभाव गुण आहेत. चीनी प्रवासी झुएनत्संग लिहितो, "उपकारकर्त्या विषयी तो कृतज्ञ व अपकारकर्त्याचा सूड घेणारा आहे. शरण जाण्याऐवजी तो स्वतःचा प्राण देण्यास तयार असतो. परंतु शत्रूचे प्राणही घेण्यास तो मागेपुढे पाहात नाही". शिवकालीन बखरीमधून इतिहासाबाबतचे काही तपशील आले आहेत त्यांचा परामर्श घेतला असता. त्यामधून काही बाबी समोर येतात. त्या पुढील प्रमाणे मांडता येते.

काही शिवकालीन घटना बाबत बखरकारांत एकमत आहे; परंतु तपशिलांत मात्र फरक आहे. सामाजिक आणि आर्थिक तपशील हा बखरकारांच्या निरीक्षणावर आधारलेला आहे. राजकीय तपशिलाबाबत मात्र थोडा फार फरक असला तरी त्यातील संदेश हे चरित्रनायकाची थोरवी कथन करणारे आहेत यात शंका नाही. शिवकालीन प्रमुख बखरींचे तुलनात्मक आशय दृष्टीने आणि ऐतिहासिक साधन म्हणून शास्त्रीय आणि चिकित्सक दृष्टीने अध्ययन केले असता या अभ्यासाची उयुक्तता अधिक पटते. त्यातील तपशिलाच्या नोंदी आणि इतिहास कथनाचा मौलिक धागा लक्षात येतो. यावरून शिवकालीन बखरीची काही वैशिष्ट्ये निश्चित केलेली आहे. ऐतिहासिक साधन या नात्याने शिवकालीन बखरीचे शास्त्रीय अध्ययन केले असता त्या आधारे प्रकट होणा-या वैशिष्टयांवर खालील दृष्टीने प्रकाश टाकला आहे.

1. बखर साम्रगी ही तत्कालीन लोकजीवनाचा आरसा आहे. त्यातील सूक्ष्म पैलू हे समाज जीवनाचे अंतरंग उलगडतात. त्यामुळे तत्कालीन लोकांच्या आचार-विचार व जीवनशैलीचे आकलन होण्यासाठी मदत मिळते.
2. शिवकाळामध्ये महाराष्ट्रातील खेडी ही मोगलाईच्या तुलनेत संपन्न होती. ग्रामीण जीवनाचे हे चित्र बखरीच्या माध्यमातून यथार्थपणे उमटले आहे.
3. शिवकालीन बखरीमध्ये तत्कालीन धार्मिक जीवनाचे चित्र रेखाटताना विविधतेत एकता प्रकटली आहे. हिंदू धर्माचे शिवकाळात प्राबल्य असले तरी हिंदू, मुस्लीम व ख्रिश्चन या समाजात सहिष्णुता होती.
4. सर्व बखर सामुग्री ही चरित्रनायकाच्या कर्तृत्वावर प्रकाश टाकते. बखरींतील सामुग्री ही शिवाजी महाराजांच्या कार्यकर्तृत्वावर प्रकाश टाकते. घटनाक्रमामध्ये थोडीशी विसंगती असली तरी चरित्रातील कर्तृत्वाचा आलेख मात्र सारखा आहे.
5. त्या काळातील सांस्कृतिक जीवन कल्पनांचे आदान-प्रदान होत असे. त्यामुळे समाजात व्यापक व सर्वसमावेशक होण्यास मदत होईल.
6. शिवकालीन बखरीमधून "महाराष्ट्रातील सैन्य, गडकोट तसेच सुरक्षाविषयक उपाययोजना कशी केली" याची माहिती स्पष्ट होते.
7. रयतेच्या भाजीच्या देठासही हात लावू नये नये कारण रयतेला आपण मुगल आहोत असे वाटेल आणि मुगलात आणि स्वराज्यात काय फरक राहील. याशिवाय रयतेच्या मनातून आपल्या विषयी तळतळाट होईल असे शिवाजी महाराज पत्रातून नमूद करतात. बखरीतील सामग्रीतून त्यास दुजोरा मिळतो असे सभासदांनी लिहिले आहे.

**निष्कर्ष -**

1. बखर वाङ्मय हा शिवचरित्राचा प्रधान आधार असून मौखिक इतिहासाचे मूलभूत साधन आहे.
2. बखर या अरबी शब्दाचा अर्थ सांगणे असा होतो. याचा अर्थ असा की, त्याच्या मूळ रूपामध्येच मौखिक परंपरेचा संदर्भ आहे. या साधनांमध्ये एकवटलेले ज्ञान है तत्कालीन समाजातील मौखिक परंपरेचा वारसा शोधणारे असते.
3. शिवकालीन बखरी या हिंदवी स्वराज्याचे निर्माते छत्रपती शिवाजी महाराजांच्या चरित्र व कामगिरीवर प्रकाश टाकणारे मौखिक साहित्य म्हणून अभ्यासल्या जातात. त्यांचा इतिहासाचे साधन म्हणूनही विशेष अभ्यास केला जातो.
4. शिवकालीन बखरी या लोक इतिहासाची मौखिक साधन आहेत. तत्कालीन सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक जीवनाचे यथार्थ प्रतिबिंब या बखरीमध्ये उमटले आहे. त्यामुळे अशा लोकजीवनाचे विविध पैलू उलगडताना बखरीचे अनन्यसाधारण महत्व आहे.

**संदर्भ ग्रंथ सूची -**


1. कुलकर्णी, भीमराव - सभासद बखर, अनमोल प्रकाशन, पुणे, 1987.
2. ग्रामोपाध्ये गं. ब. - मराठी बखर गद्य, व्हीनस प्रकाशन, पुणे, 1963.
3. पठाण यु. म. - शिवप्रभूचे चरित्र, समर्थ प्रकाशन, औरंगाबाद. 1974.
4. भगत, दत्ता - कृष्णाजी अनंत सभासदकृत श्री शिवछत्रपतीचे चरित्र, प्रतिमा प्रकाशन पुणे, 2001.
5. वाकसकर, विनायक सदाशिव - श्री. शिवप्रभूचे चरित्र, व्हीनस प्रकाशन, पुणे 1973.
6. वाकसकर सं. वि. स. - श्री शिवछत्रपतींची 91 कलमी बखर आणि भोसले घराण्याची चरितावली, व्हीनस प्रकाशन, पुणे, 1962.
7. सोबनी अविनाश (सपा.) - ऐतिहासिक बखरी खंड - 1, शब्दवेध प्रकाशन, पुणे, 1998.
8. हेरवाडकर, रघुनाथ विनायक - कृष्णाजी अनंत सभासद विरचित शिछत्रपतीचे चरित्र (सभासद बखर), व्हीनस प्रकायन, पुण 2002.